संपादक : भीमाशंकर कटारे

अठ्ठावीस वर्षांची वाटचाल

# उद्योगश्री

दीपावली २०१०

मूल्य ५० रुपये

## भावी उद्योजक घडविण्यासाठी...

## अभ्यासक्रमी उद्योजकता!

परिसंवाद...



यशोगाथा...

उद्योगनीती...



## अभ्यासक्रमी उद्योजकता

कामात दंग झाले तर सोसायटीची कामे भंग होतील हे आपण जाणतोच. इमारतीची पाहणी, दुरुस्ती, नळ-पाणीपट्टी, वीज बिल, दरमहा बिल- त्यांचे हिशोब, महानगरपालिकेचे कर अशा कामांसाठी प्रशिक्षित माणसे गरजेची असतात. ही रोजगाराची नामी संधी आहे. दोन लहान सोसायटीत एखादा इस्टेट मॅनेजर काम करू शकतो. या दृष्टीने श्री. जोशी साहेब यांनी अभ्यास करून युवकांना प्रशिक्षित करून या क्षेत्रात रोजगार निर्माण करतात. या दृष्टीने त्यांनी आपल्या संस्थेचे ट्रेडमार्क रजिस्टर केले आहे.

एवढेच नव्हे तर ट्रॅव्हल होम, चिमूट मसाले, अशा काही योजनाही ते आकारतात. सध्या पर्यटन उद्योग वाढीस लागला आहे. प्रवासात उत्तम राहण्यासाठी लॉजचे भाडे भरावे लागते. त्याऐवजी पर्यटन स्थळी ज्यांच्या मोठ्या जागा रिकाम्या आहेत, त्यांच्यात एकोपा आणून पर्यटकांची सुविधा करता येते. मोठी बचत साधता येते. परस्पर स्नेह, सौहार्द, भाईचारा व बचत हे उद्दिष्ट त्यातून साध्य करता येईल. अशा एन. ए. जोशींना एकदा भेटा तर... त्यांचा मोबाईल नंबर आहे ९८१९३०४५९९.

♦♦♦

## उद्योगनीती

### माझी नव्हे, आपली कंपनी



जळगाव शहराला जागांच्या औद्योगिक नकाशावर आणले ते भंवरलाल जैन यांनी. बी.कॉम. झाल्यावर आईने उद्योग करण्याचा सल्ला दिला. अनेक क्षेत्रात पुढे आले. ते बोलताना केव्हाही माझी कंपनी न म्हणता आपली कंपनी म्हणायचे. म्हणजे ऐकणारा सोबती तेवढ्यापुरता का होईना, कंपनीचा चालक होऊन जायचा. सामान्य माणसाकडून असामान्य कामे करून घेता येतात असा त्यांचा अनुभव ठरला. आपण आपल्या उद्योगाचे प्रमुख असलो तरी प्रथम व्यावसायिक आहोत, ही मनाशी गाठ बांधून घ्यायची. सुट्टी कधी घेता असे एकदा मुलाखतकार विचारताच 'सुट्टी म्हणजे काय?' असा प्रश्न भवरलाल जैन यांनी त्या मुलाखतकारास विचारला. तेव्हा मुलाखतकाराचा चेहरा फोटो काढण्यासारखा झालेला दिसला.